**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**सार्वत्रिक निवडणूक-2025**

प्रारुप मतदार यादी, त्यावरील हरकती सूचना बाबत प्रसिध्दीकरण

## -: जाहीर सुचना :-

मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी पत्र क्र.रानिआ/मनपा-2025/प्र.क्र.41/का.5 दि.13.11.2025 चे आदेशान्वये सोलापूर महानगरपालिका, सार्वत्रिक निवडणूक-2025 करिता निवडणूकीच्या अनुषंगाने मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम खालील प्रमाणे निश्चित केलेले आहे.

मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

| अ.क्र. | मतदार यादी कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रारूप मतदार यादी, हरकती व सुचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.20.11.2025 |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखलंकरण्याचा अंतिम दिनांक | दि.27.11.2025 |
| 3 | प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करणे. | दि.05.12.2025 |
| 4 | मतदानकेंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे | दि.08.12.2025 |
| 5 | मतदानकेंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.12.12.2025 |

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार सार्वत्रिक निवडणूक-2025 करिता दि.01.07.2025 रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधान सभेची मतदार यादी, सार्वत्रिक निवडणूक-2025 च्या महानगरपालिका निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करणेसाठी वापरण्यात येतील असे अधिसुचित केले आहे. त्यानुसार प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादया तयार करण्यात आलेल्या आहेत, प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादया कौन्सिल हॉल, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या ठिकाणी व सोलापूर चे महानगरपालिकाचे संकेतस्थळ www.solapurcorporation.gov.in दि..20.11.2025 रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.तसेच प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रतीपृष्ठास र.रु.2/- याप्रमाणे व प्रारूप मतदार यादीची फोटो नसलेले मतदार यादी सी.डी / पेन ड्राईव्ह.र.रु.100/-- या दराने निवडणूक मुख्य कार्यालय, डॉ.कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांकरिता विक्रीस उपलब्ध करण्यात आलली आहे.

प्रसिध्द करण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूक-2025 करिता प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीवर नागरिकांकडून फक्त खालील बाबींवर हरकती व सूचना दि.20.11.2025 ते दि.27.11.2025 अखेर निवडणूक मुख्यकार्यालय, डॉ.कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील.

1) लेखनिकांच्या काही चुका.
2) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.
3) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

**टीप** -तथापि राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/ग्रापनि2023/प्र.क्र.03/का-8,दिनांक 29.10.2025 च्या नुसार मुळ विधानसभा मतदार यादीत ( मा.राज्य निवडणूक आयोग यानी अधिसुचित केलेली दि.1.7.2025 या दिवशी अस्तित्वात असलेली विधान सभा मतदार यादी) नसलेली कोणतेही नविन नाव समाविष्ठ करण्याचे अथवा मुळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे तसेच त्यामध्ये कोणत्याही दुरूत्या करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाची मतदार यादी तयार करण्याकरीता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

**डॉ. सचिन ओम्बासे** (भा.प्र.से.)
आयुक्त,
तथा मुख्यनिवडणूक अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर